# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### परभणी जिल्ह्यातील विद्युत विकासाच्या प्रलंबित कामांबाबत

**(१) २९७८ (२८-०५-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात सौर कृषी पंप, कृषी पंप, १३२ केव्ही, विद्युत रोहीत्र, शहरी विद्युत विकास आराखडा, उपकेंद्रे उभारणी व इतर सर्व विकास कामे प्रलंबित असल्याबाबत परभणी येथील लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विहित मुदतीत कामे पूर्ण न केलेल्या जबाबदार असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार व इतर यंत्रणांची कामनिहाय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरणच्या विविध योजनेंतर्गत विद्युत विकास कामे विविध कंत्राटदारांमार्फत केली जातात. ज्या कंत्राटदारांकडून कामे विहित कालावधीत पूर्ण झालेली नाहीत अशा कंत्राटदारांना निविदा कार्यादेश नोटीस टू करेक्ट देण्यात आली आहे. सदर विलंबाबाबत महावितरणचे अधिकारी, कर्मचारी कोणीही दोषी आढळून आले नसल्याने त्यांचेविरुध्द चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गड-किल्ल्यांसह पुरातत्व वास्तूंचे संरक्षण करणाऱ्या हंगामी कामगारांना वेतन मिळण्याबाबत

**(२) ३२१२ (२९-०५-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड-किल्ल्यांसह पुरातत्व वास्तूंचे संरक्षण करणाऱ्या हंगामी कामगारांना मागील तीन ते सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गड किल्ल्यांचे देखभाल करणाऱ्या १९३ कामगारांपैकी १२१ कामगारांना लॉकडाऊनमुळे वेतन देण्यास पैसे नसल्याने त्यांना कामावरून कमी करण्याचा पुरातत्व विभागाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील ऐतिहासिक वारसा जतन करणाऱ्या कामगारांबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर (जि.पालघर) तालुक्यातील मासवण-नागझरी रस्त्यांच्या कामाबाबत

**(३) ३६३६ (०२-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पालघर (जि.पालघर) तालुक्यातील मासवण-नागझरी हा आठ किमी अंतराचा पाच कोटी खर्चाच्या रस्त्यांच्या कामाचा कार्यादेश सन २०१६ मध्ये देण्यात आला असून प्रत्यक्ष कामाला सुरूवात सन २०१७ मध्ये झाल्यानंतरही हा रस्ता अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर अंदाजपत्रकात अंतर्भूत असलेल्या कामापैकी मासवण-नागझरी रस्त्याच्या दोन्ही बाजूस साईटपट्‌टी, मोऱ्या आणि दिशादर्शक फलक यांची कामे अपूर्ण आहेत, रस्ता तयार करताना खडी, मुरूम आणि डांबराचा अल्प प्रमाणात वापर करण्यात असल्यामुळे रस्ता निकृष्ट दर्जाचा झाल्याबाबत मासवण, वांदिवली, काटाळे, लोवरे, निहे आणि नागझरी येथील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांचेकडे तक्रार केली असतानाही ठेकेदारांकडून रस्ता तयार करण्याचे काम सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्षभरातच रस्त्यांची दुरवस्था झाल्याने या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या गावातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच रूग्णांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाच कोटी रूपये खर्च करून तयार करण्यात आलेला रस्ता वर्षभरात खराब झाल्याने ग्रामस्थांनी तातडीने रस्ता दुरूस्त करण्यात यावा तसेच रस्त्यांच्या कामाची चौकशी करून ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मासवण, काटाळे, लोवरे आणि निहे ग्रामपंचायतीमधील जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन रस्त्यांची कामे विनाविलंब सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील रामा-३४ मासवण ते नागझरी, ता.पालघर या रस्त्याच्या दर्जोन्नतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन सदर मुख्य रस्त्याचे काम दिनांक ०३ मे, २०१८ रोजी पूर्ण झालेले आहे. परंतु, पूर्ण लांबीमध्ये ठेकेदाराने रोड फर्निचरचे काम केलेले नसल्यामुळे ठेकेदाराकडून दंड वसूली करण्यात आलेली आहे. तसेच सदर रस्त्याचे अंतिम देयक अदा केलेले नाही.

सदर रस्त्याच्या कामाची वेळोवेळी तपासणी झाली असून कामाबाबतचा शेरा समाधानकारक आहे. रस्त्याच्या बाजूला स्टोन क्रशर व दगडाच्या खाणी मोठ्या प्रमाणात असल्याने रस्त्याची हानी झाल्याने सदर रस्त्यावरील खड्डे भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच सदर रस्त्याच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित राज्य गुणवत्ता निरीक्षक (SQM) यांचेकडून रस्त्याची तपासणी करण्यात आली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा अहवाल दिलेला आहे व सदर रस्त्यावरून वाळू वाहतूक झाली असल्याने व सद्य:स्थितीत Crushed Metal व Rubble ची वाहतूक होत असल्याने रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग खराब होत असलेबाबत निरीक्षण नोंदविलेले आहे.

---

## जिल्हा परिषद हायस्कूल काटोल रोड, नागपूर येथे सहायक शिक्षण पदाकरीता बोगस दस्तऐवज सादर करुन नोकरी मिळविल्याबाबत

**(४) ४१७३ (१७-०७-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर जिल्हा परिषद यांच्या माहे जुलै, १९९९ च्या आदेशान्वये श्री.राजेश दादाजी मरसकोल्हे यांची जात पडताळणी अहवालावर अवलंबून तसेच जात पडताळणी प्रतिकूल असल्यास तात्काळ सेवेतून कमी करण्यात येईल या अटीवर जिल्हा परिषद हायस्कूल, नांद, ता.भिवापूर, जि.नागपूर येथे सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्ती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.राजेश मरसकोल्हे यांच्याऐवजी श्री.राजेंद्र दादाजी मसरकोल्हे असे नावात साधर्म असल्याने शैक्षणिक जात वैधता प्रमाणपत्र तसेच कमी वयात शैक्षणिक अर्हता पूर्ण केल्याचे बोगस व खोटी कागदपत्रे सादर करुन आजपावेतो नोकरी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.राजेंद्र मरसकोल्हे सन २०१९ मध्ये जिल्हा परिषद (माजी शासकीय) कन्या शाळा, काटोल रोड, नागपूर येथे कार्यरत असताना विद्यार्थीनींशी असभ्य वर्तणूक केल्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले होते व याबाबतचा अहवाल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने जिल्हाधिकारी, नागपूर, पोलीस आयुक्त, नागपूर व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडून मागविला असून श्री.मरसकोल्हे आपल्या राजकीय व्यक्तींच्या ओळखीचा वापर करुन सदरहू अहवाल पाठविण्याबाबत संबंधितांवर दबाव टाकत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व आदिवासी हलबा समाज समिती, चंद्रपूर यांनी संबंधितांवर कारवाई करुन शासन सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळविलेल्या संबंधितास सेवेतून बडतर्फ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय.
(५) श्री.मरसकोल्हे यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळविल्यासंदर्भात प्राप्त तक्रारीत चौकशीअंती सत्यता आढळून आलेली नाही. तथापि, श्री.मरसकोल्हे यांना असभ्य वर्तणूकीसंदर्भातील आरोपांबाबत विभागीय चौकशीत दोषी आढळून आल्याने त्यांना दिनांक २८/१०/२०२० च्या आदेशान्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. यासंदर्भात श्री.मरसकोल्हे यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे केलेले अपील त्यांनी दिनांक २६/०७/२०२१ च्या आदेशान्वये फेटाळले आहे.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) ६१६२ (१७-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील १५६३ हून अधिक गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा व सोयी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील गावांमध्ये स्मशानभूमीसाठी आवश्यक जागा तसेच उपयुक्त सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) यवतमाळ जिल्हयात एकूण १२०१ ग्रामपंचायती असून महसूली गावांची संख्या १८३८ इतकी आहे. माहे नोव्हेंबर, २०२० अखेर ११९५ गावांमध्ये स्मशानभूमी शेड बांधकाम झालेले आहे. तसेच सन २०२०-२०२१ मध्ये एकूण ६१ स्मशानभूमी शेडची कामे मंजूर असून १० कामे पूर्ण झालेली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. सद्य:स्थितीत जिल्हयामध्ये ५६१ गावामध्ये स्मशानभूमी शेड उपलब्ध नसून त्यापैकी ९८ गावांमध्ये स्मशानभूमी शेडसाठी जागा उपलब्ध नाही. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात जनसुविधा योजनेसाठी रुपये २१.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर असून त्यामधून २८ स्मशानभूमी शेड व इतर सोयीसुविधेची कामे प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग येथील जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(६) ६१७५ (०१-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालय येथील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.श्रीमंत चव्हाण यांच्या कार्यपध्दतीमुळे त्यांची बदली करावी किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात यावे अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हयातील डॉक्टरांच्या पाच संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.पालकमंत्री, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्याकडे निवेदनाद्‌वारे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालय येथील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.श्रीमंत चव्हाण यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात संघटनांनी दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१) हे खरे नाही, परंतु डॉ.श्रीमंत हरिभाऊ चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, सिंधुदुर्ग यांची अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, औरंगाबाद येथे त्यांच्या विनंतीनुसार दिनांक १ डिसेंबर, २०२० च्या आदेशान्वये बदली करण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "एन-९५ मास्क" व "पीपीई" किटच्या खरेदीत अनियमितता झाल्याबाबत

**(७) ८५४९ (१७-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात "एन-९५ मास्क" व "पीपीई" किटच्या खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करावी अशी मागणी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्राव्दारे लोकप्रतिनिधींनी शासनाला केली असून प्रत्येक जिल्ह्यात ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दराने मास्क व पीपीई किटची खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मास्क व पीपीई किटच्या खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करुन मास्कचे दर नियंत्रणात ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

एन-९५ मास्क व पीपीई किट, खरेदीबाबत झालेल्या अनियमिततेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींना प्राप्त झालेली आहे हे खरे आहे.

परंतु जिल्हयांना सदर खरेदीस कोणतेही दर ठरवून दिले नसल्यामुळे, ठरवुन दिलेल्या दरापेक्षा अधिक दराने खरेदी झालेली नाही.

(२) लोकप्रतिनिधींकडुन प्राप्त तक्रारीनुसार मास्क व पीपीई किटच्या झालेल्या खरेदीबाबत सविस्तर माहिती आरोग्य सेवा संचालनालय स्तरावर मागविण्यात आली आहे. कोविड-१९ च्या काळामध्ये लॉकडाऊन सुरु असल्यामुळे तसेच कच्चा माल पुरवठा अडचणीमुळे जिल्हामध्ये वेगवेगळे दर प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील कोविड सेंटरमध्ये सेवा देणाऱ्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेणेबाबत

**(८) ८७१३ (१५-०७-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील कोविड सेंटरमध्ये सेवा देणाऱ्या ३६५ कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्याची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

कोविड सेंटरमध्ये सेवा देणाऱ्या ४०० कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत निवेदन प्राप्त आहे.

(२) कोविड उपचार केंद्रातील नियुक्त्या ह्या पूर्णपणे कंत्राटी व कोविड-१९ साथरोग तात्पुरत्या कालावधीपुरता असल्याने अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना संक्रमणाच्या काळात वैद्यकीय उपकरणाचे दर दुप्पट झाल्याबाबत

**(९) ९०५० (१७-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात कोरोनाने १६१४ रूग्णांचा मृत्यू झाला असून शहरी भागात अंदाजे ६२ हजार कोरोना बाधित रूग्ण घरीच गृहविलगीकरणात असून त्यांना किमान दरापेक्षा जास्त दराने वैद्यकीय उपकरणे विकत घ्यावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संक्रमणाच्या काळात वैद्यकीय उपकरणाचे दर दुप्पट झाले असून ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा अभाव, कोविड केअर सेंटर आणि विलगीकरण केंद्राअभावी कोरोनाग्रस्तांना उपचार मिळत नसल्याने मृत्यूचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय उपकरणाचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाचे नियम असतानाही विक्रेत्यांकडून नियमांचे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय उपकरणाचे दर नियंत्रणात ठेवण्याबाबत व नियमांचे पालन न करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करुन नागपूर जिल्हयामध्ये कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सार्वजनिक आरोग्य विभाग व अन्न आणि औषध प्रशासन यांच्या समन्वयाने कोविड-१९ साठी लागणाऱ्या वैदयकिय बाबींच्या किमंतीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोटस रुग्णालय, बीड येथे उपचाराकरिता दाखल झालेल्या वरिष्ठ तुरुंगाधिकाऱ्याच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत

**(१०) ९०७१ (१७-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटस रुग्णालय, बीड येथे उपचाराकरीता दाखल झालेल्या वरिष्ठ तुरुंगाधिकारी संजय कांबळे यांचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याप्रकरणी लोटस रुग्णालयावर सुरु असलेल्या चौकशीची कार्यवाही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयामधील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे वरिष्ठ तुरुंगाधिकाऱ्याचा मृत्यू झाला असून दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून लोटस रुग्णालयाच्या चौकशीसंदर्भात राजकीय नेते हस्तक्षेप करीत असल्याने चौकशी समितीबाबत संशय निर्माण होत असून चौकशी समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केला नाही, असे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लोटस रुग्णालयामधील दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) या प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांचेस्तरावरुन दिनांक १७/११/२०२० अन्वये त्रिसदस्यीय समिती गठीत केली होती. सदर समितीने दिनांक १९/१२/२०२० रोजी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये लोटस रुग्णालयातील डॉक्टर व नर्सिंग स्टाफ यांनी योग्य उपचार केल्याचे नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली व परभणी जिल्ह्यात विविध शासकीय विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी वर्गाला लसीकरण व आरोग्य विमा योजना लागू करण्याबाबत

**(११) ९२३९ (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली व परभणी जिल्ह्यात विविध शासकीय विभागात रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत अभियान, संगणक चालक, कंत्राटी नर्स, आशा वर्कर, ग्रामीण रूग्णालयातील कंत्राटी डॉक्टर, लॅब टेक्निशियन, वाहन चालक, कृषी विभागातील व पोकरा योजनेंतर्गत कंत्राटी पदावर काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला कोरोना प्रतिबंध करण्यासाठी लसीकरण व आरोग्य विमा योजना लागू नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी पदावर काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाचे आरोग्य धोक्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली व परभणी जिल्ह्यात विविध शासकीय विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी वर्गाला कोरोना प्रतिबंध करण्यासाठी लसीकरण व आरोग्य विमा योजना लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार हिंगोली व परभणी जिल्ह्यात विविध शासकीय विभागात कार्यरत कंत्राटी हेल्थ केअर वर्कर व फ्रंट लाईन वर्कर या वर्गाचे कोविड लसीकरण केले जात आहे.

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत जाहीर प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजअंतर्गत कोविड रुग्णालयामध्ये अथवा कोविड रुग्णांना प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या शासकीय सेवेत कार्यरत व सेवा अधिग्रहित केलेल्या खाजगी मान्यता प्राप्त रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्सेस इ. क्षेत्रिय आरोग्य कर्मचारी यांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्यास त्यांना रुपये ५० लाखाचे विमा संरक्षण कवच देण्यात आले आहे. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचा मृत्यू हा कोविड-१९ संबंधित कर्तव्यावर असताना अपघातामुळे झाल्यासही सदरचे विमा संरक्षण लागू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेमध्ये पती-पत्नी एकत्रीकरण करण्याबाबत

**(१२) ९४६३ (१५-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेमध्ये १५-१५ वर्षे वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक दांपत्यांना पती-पत्नी एकत्रीकरणाबाबत प्राधान्य न दिल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेमध्ये १००% पती-पत्नी एकत्रीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-१२-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या ह्या संगणकीय ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतचे धोरण २४/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले. त्यामध्ये मुद्दा क्र.०९.३ नुसार पती-पत्नी एकत्रिकरणाकरीता विशेष संवर्ग शिक्षक भाग-२ मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ७/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे आंतरजिल्हा बदल्यांबाबतचे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्येदेखील मुद्दा क्र.०८.३ नुसार पती-पत्नी एकत्रिकरणाकरीता विशेष संवर्ग शिक्षक भाग-२ मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

---

## प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१३) १०४२६ (०६-१२-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा - भाईंदर शहराला अतिरिक्त पाणी मिळण्याकरिता काजूपाडा ते घोडबंदरपर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत हाती घेतले असताना स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होत असल्याने त्यांनी या कामास विरोध केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलवाहिनी टाकण्याच्या कामास विलंब होवू नये याकरीता प्रकल्पबाधित २५ शेतकऱ्यांच्या मुलांना मिरा - भाईंदर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याचा ठराव सन २००३ च्या महासभेत मंजूर करण्यात येवूनसुद्धा आजमितीपर्यंत प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, सदरहू प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/०६/२००३ अन्वये ०७ प्रकल्पग्रस्त शेतकरी व जलवाहिनी टाकण्याच्या कामात बाधित होणारे १८ आदिवासी अशा एकूण २५ बाधीतांच्या प्रस्तावास महासभेने मंजूरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतूदीनुसार वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदावर नियुक्ती करण्यास महानगरपालिका सक्षम असल्याचे दिनांक २६/०६/२००६ च्या शासन पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले.

त्यासअनुसरून ०७ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांपैकी ०१ गैरहजर व ०१ मयत वगळता ०५ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना महानगरपालिकेत कायमस्वरूपी सामावून घेण्यात आलेले आहे.

उर्वरित प्रकल्प बाधितांची आवश्यक ती कागदपत्रे महानगरपालिकेस प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या न्याय व प्रलंबित मागण्यांबाबत

**(१४) १०६४२ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या न्याय व प्रलंबित मागण्या तात्काळ निकाली काढण्यासंदर्भात नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजी विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन या संघटनेचे निवेदन पत्रासोबत शासनास पाठविले असून संघटनेच्या निवेदनातील १७ मागण्यांवर तातडीने निर्णय घेवून निकाली काढण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संघटनेच्या व जनप्रतिनिधींच्या निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर मागण्यांबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथील सेंचुरी रेयॉन कंपनीने वालधुनी नदीपात्रात अवैधरित्या भराव टाकून नदीपात्र बुजविल्याबाबत

**(१५) १०८४६ (२०-११-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीकिनारी सेंचुरी रेयॉन कंपनीची जागा असून सन २००० पासून सेंचुरी रेयॉन कंपनीने वालधुनी नदीपात्रात अवैधरित्या भराव टाकून नदीपात्र बुजविल्यामुळे पावसाळ्यात योगीधाम, त्रिमुर्ती कॉलनी, अनुपमनगर, घोलपनगर या भागातील नागरी वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने मोकळ्या जागेबरोबर वालधुनीच्या पात्रात भराव टाकल्यानंतर त्या ठिकाणी बिर्ला इस्टेट विकासकाच्या नावाने इमारती बांधण्याचे कामकाज सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीपात्रातील अवैध भराव व बांधकामामुळे पुराच्या पाण्याचा धोका वाढला असल्याने या प्रकरणी वालधुनी स्वच्छता समितीचे पदाधिकारी यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अवैध भराव हटवून अवैध बांधकाम निष्कासित करुन दोषी कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२२) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वालधुनी नदीपात्रात सेंच्युरी रेयॉन कंपनीने अवैधरित्या भराव टाकले, अशी वस्तुस्थिती नाही.
(२) मौजे शहाड येथील सर्व्हे नं.१६५३, १५५०/ब,ड (स.नं.१६/१पै, १/५पै.) १७, १८ व २१८ ही जागा महानगरपालिकेच्या विकास योजनेमधील आरक्षण क्र. २४३ "परिवहननगर" या आरक्षणाने बाधित असून या भूखंडावर समावेशक आरक्षणाच्या धोरणानुसार बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर बांधकाम परवानगी मधील प्रस्तावित इमारती व वालधुनी पात्र यामध्ये सी.आर.झेड. क्षेत्र असून वालधुनी नदीपात्र व सी.आर.झेड. क्षेत्रामध्ये कोणताही भराव टाकण्यात आलेला नसून, बांधकाम देखील करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) अशा आशयाचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झालेले असून यासंर्भात महानगरपालिकेमार्फत विकासक यांचेकडून खुलासा मागविण्यात आला.

सदर खुलासामध्ये कोणतेही भराव टाकण्यात आले नसल्याचे नमूद केले असून याबाबत तक्रारदारास अवगत करण्यात आलेले आहे.
(४) व (५) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने प्रत्यक्ष जागेची पाहणी केलेली असून नदीपात्रामध्ये कोणताही भराव केले असल्याचे दिसून आलेले नाही.

नदीपात्रापासून सी.आर.झेड. क्षेत्र सोडून दिलेल्या बांधकाम परवानगीनुसार प्रत्यक्ष बांधकाम केले असल्याने, कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील आयसीटी शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१६) १११३३ (१८-११-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयसीटी शिक्षकांना सेवेत सामावून घेऊन इतर राज्यांप्रमाणे शासन हिस्स्यातून वेतन अदा करण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. राज्यातील आयसीटी शिक्षक बाह्य यंत्रणेच्या आस्थापनेवर असल्यामुळे ते कंत्राटदाराच्या आस्थापनेवर आहेत. त्यामुळे त्यांना सामावून घेता येणार नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील समाज विकास अधिकारी यांच्या पदभरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) ११२९४ (०६-१२-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या समाज विकास अधिकारी श्रीमती दिपाली पोवार जोशी यांचा पद भरती अर्ज हा छाननी तक्ता व पदभरती जाहिरातीतील विविध अटी (अट क्रमांक ६, ७, ९, १५, १८ नुसार) शर्ती नुसार शाळा सोडल्याचा दाखला, डोमेसाइल, तत्कालीन कार्यालयाचा ना-हरकत दाखला नसल्यामुळे बाद ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा कारवाई कृती अहवाल (ATR) काय आहे,

(३) असल्यास, सदर पदभरतीमधील श्रीमती दिपाली पोवार जोशी यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांमध्ये खाडाखोड, सदर पद भरती प्रश्नपत्रिका याची नमुना मार्गदर्शक उत्तरपत्रिकाही बनविलेली नसणे, उत्तरपत्रिकेत अंत्योदय व अन्नपूर्णा योजना तसेच राजमाता जिजाऊ माता बालक योजना वैशिष्ट्य या प्रश्नासंबंधित चुकीच्या उत्तरांसाठी त्यांना पूर्ण गुण देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री गोविंद परब, चौकशी अधिकारी यांनी दिपाली पोवार यांना उपसमाज कल्याण अधिकारी पदाच्या जाहिरातीनुसार अनुभव असल्याचा खोटा अहवाल दिल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यांच्या नियुक्तीस मीरा भाईंदर महानगरपालिका महासभा दिनांक २०/०६/२०११ नुसार गैरव्यवहार झाल्यामुळे स्थगिती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, विविध व्यक्तींनी तक्रारीद्वारे पदभरती नियुक्तीमधील गैरव्यवहार निदर्शनास आणून दिल्यानंतरही भाईंदर पश्चिम पोलीस ठाणे, मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालय, वसई विरार यांच्याकडून प्राप्त तक्रारीनुसार श्रीमती दीपाली यांचे भरतीचे अभिलेख अधिग्रहित करून चौकशी, तपास व कारवाई करण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, श्रीमती दिपाली पोवार जोशी यांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांची नियुक्ती करणारे तत्कालीन आयुक्त, सर्व भरती निवड समिती सदस्य, परीक्षा नियंत्रक, चौकशी अधिकारी, भरती प्रक्रिया करणारी एजन्सीयांच्यावर भारतीय दंड संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरणेकरीता दिनांक १७/०८/२०१० रोजी सेवाप्रवेश नियम २००५ मधील शैक्षणिक पात्रतेनुसार वृत्तपत्रात तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सेवा योजन कार्यालय ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांचेकडून उमेदवारांच्या याद्या मागविण्यात आल्या.

विहित मुदतीत प्राप्त यादीतील उमेदवारांची स्पर्धात्मक लेखी परीक्षा दिनांक २३/०१/२०११ रोजी घेण्यात येऊन दिनांक २५/०५/२०११ रोजी मुलाखत घेण्यात आली.

समाज विकास अधिकारी या पदासाठी गुणानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करून महासभा ठराव क्र.२७, दिनांक ३०/०५/२०११ अन्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना नेमणूकीचे आदेश देण्यास मंजूरी दिली.

त्यासअनुसरून श्रीमती दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी यांना दिनांक ३०/०५/२०११ रोजी नेमणूक आदेश देण्यात आले.

समाज विकास अधिकारी या पदावर शासन नियम, महासभा व निवड समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दतीने निवड करण्यात आली असल्याने यामध्ये कोणताही अनुचित प्रकार झाला नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे गाव मिरे (ता.जि ठाणे) येथील जमिनीवरील बांधकाम परवानग्या रद्द करण्याबाबत

**(१८) ११३०७ (२०-११-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गाव मिरे (ता.जि ठाणे) जुना सर्वे क्रमांक १७२ नवीन सर्वे क्रमांक ४२ हिस्सा क्रमांक ३ अ एकूण क्षेत्रफळ ४४.५० गुंठे, जुना सर्वे क्रमांक १७२ नवीन सर्वे क्रमांक ४२ हिस्सा क्रमांक ६ एकूण क्षेत्रफळ ४ गुंठे तसेच जुना सर्वे क्रमांक १६६ नवीन सर्वे क्रमांक ३७ हिस्सा क्रमांक १ब एकूण क्षेत्रफळ ३ गुंठे येथील सदर जमिनीचे सातबारा नोंदी महसूल विभागाच्या अभिलेखनुसार श्री.बळवंत जैराम पाटील यांच्या नावे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीरा भाईंदर महानगरपालिका जा.क्र. मि.भा/ मनपा/ नर/ १४६६/ २००६-०७, दिनांक ०१/०८/२००६, जा.क्र. मि.भा/ मनपा/ नर/ ३५३५/ २००७-०८, दिनांक ०३/०१/२००८, जा.क्र. मि.भा/ मनपा/ नर/ ३६८९/ २०१०-११, दिनांक १०/०१/२०११, जा.क्र. मि.भा/ मनपा/ नर/ ५७६/ २०११-१२, दिनांक १३/०५/२०११, जा.क्र. मि.भा/ मनपा/ नर/ १४६०/ २०१४-१५, दिनांक ०८/०८/२०१४ बांधकाम परवानगी नियमबाह्यरित्या जमीन मालकाची फसवणूक करून, जमीन खरेदी न करता संगनमत करून विकासक व तत्कालीन आयुक्त श्री.शिवमुर्ती नाईक, श्री.सुरेश काकानी, तत्कालीन नगररचना अधिकारी श्री.सत्यवान धनेगावे, श्री.दीलीप प्रभाकर घेवारे यांनी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाईंदर पोलीस ठाणे, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे श्री बळवंत जैराम पाटील यांचे वारस श्री.नरेंद्र बळवंत पाटील आणि त्यांचे कायदेशीर मुखत्यार श्री.प्रदीप जंगम यांनी तक्रार दाखल केली असून चौकशी, तपास, कारवाईसाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मीरा भाईंदर महानगरपालिकेकडून संबंधित सर्व बांधकाम परवानग्या रद्द करुन, दोषी विकासक आणि तत्कालीन महानगरपालिका अधिकारी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०१-२०२२)** : (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे मिरा सर्व्हे क्र.१७२/३अ,६, १६६/ब या जागेसाठी दिनांक १३/१२/१९८८ रोजी ७/१२ धारक श्री.बळवंत पाटील व इतर ७ यांनी मिरा डेव्हलपर्स प्रा.लि. यांना अनोंदणीकृत General Power of Attorney दिलेली आहे.

तद्नंतर फेब्रुवारी, १९९२ मध्ये मे.मिरा डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी मे.जांगिड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना अनोंदणीकृत Power of Attorney दिलेली आहे.

सदर Power of Attorney च्या आधारे नियमानुसार त्या-त्या वेळचे तत्कालीन आयुक्त यांच्या मान्यतेने बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या आहेत.

(३) श्री.प्रदिप जंगम यांनी दिनांक २०/०८/२०२१ रोजी भाईंदर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली.

सदर घटनास्थळ काशिमिरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने सदर तक्रार दिनांक २९/११/२०२१ रोजी त्यांचेकडे वर्ग केली.

काशिमिरा पोलीस स्टेशन येथे सदर तक्रारीची चौकशी सुरू आहे.

(४) व (५) विषयांकित जागेसाठी देण्यात आलेल्या परवानग्या मालकी हक्काबाबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे नियमानुसार दिलेल्या असल्याने परवानग्या रद्द करणे किंवा कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयात प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यासाठी पात्र ठरणाऱ्या शाळांचा अवघड क्षेत्रात समावेश करणेबाबत

**(१९) ४११६७ (०४-०४-२०१८) डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात प्राथमिक शिक्षकांच्या बदलीसाठी शासनाने तयार केलेल्या अवघड शाळा व सर्वसाधारण शाळांच्या क्षेत्रात दुरुस्ती करण्यासह अवघड क्षेत्रासाठी पात्र ठरणाऱ्या शाळांचा अवघड क्षेत्रात समावेश करावा, अशी मागणी येथील प्राथमिक शिक्षक महासंघाने केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र शाळांचा अवघड क्षेत्रात समावेश करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-१२-२०२१) :** (१), (२) व (३) शिक्षक संवर्गाच्या जिल्हातंर्गत बदल्यांबाबत दिनांक ७/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील

परिशिष्ठ -१ मध्ये अवघड क्षेत्राचे निकष निश्चित करण्यात आले असून, त्याच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून अवघड क्षेत्र अंतिम करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यात रेल्वे स्थानकांवर ठेवण्यात आलेल्या ॲम्बुलन्सच्या वापराबाबत

**(२०) ४७९१८ (०५-०७-२०१९) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर राज्य शासनातर्फे जखमी प्रवाशांच्या मदतीसाठी ॲम्बुलन्स ठेवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रेल्वे स्थानकांची नावे काय आहेत, रेल्वे स्थानकाजवळ १०८ क्रमांकाच्या ॲम्बुलन्सचा वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यामध्ये एकूण ९३७ बेस लोकेशन आहेत. बेस लोकेशन हे हॉस्पिटल, पोलीस स्टेशन, हायवे, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी आहेत. मुंबईतील एकून ३९ रेल्वे स्टेशन बेस लोकेशन आहेत.

(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.